**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. १७**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १३/१२/२०१७ रोजी दुपारी ३=३० ( साडे तीन ) वाजता म.ज्योतिबा फुले सभागृह ( स्थायी समिती सभागृहात ) भरेल

**विषय क्र. १५१**
**मा . सौ. सुनिता वाडेकर व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २८.११.२०१७ चे पत्र .**

मुंबई–पुणे रस्ता रेल्वे गेट नं.२० बोपोडी याठिकाणी ४ सिट्स स्त्री व ४ पुरुष इसक ८ सिट्चे फायबर शौचालय आहे. सदर शौचालय हे रस्तारुंदीकरणात बाधित होत असून ते काढून त्याच्याच बाजूला आर.सी.सी. बांधकामामध्ये शौचालय बांधण्यात यावे .

**विषय क्र. १५२**
**मा .संजय भोसले ,गटनेते,शिवसेना व मा.विशाल धनवडे यांचे दि.२९.११.२०१७ चे पत्र .**

महापालिकेच्या सर्व खात्यामध्ये कार्य करत असणाऱ्या सर्व महिलांच्या कुटंबातील ( पती,मुले, सासु, सासरे ) यांना वैद्यकीय सहाय्य योजनेमध्ये लाभ मिळावा . त्यांचे नाव वैद्यकीय सहाय्य योजनेमध्ये समाविष्ट करावे .

**विषय क्र. १५३**
**मा .प्रमोद (नाना ) भानगिरे यांचे दि. ३० .११.२०१७ चे पत्र .**

पुणे मनपाच्या अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या धर्तीनुसार पुणे महानगरपालिका हद्दीतील अंध, अपंगाच्या उदर निर्वाहासाठी दरमहा २०००/– रु.पेंशन देण्यात यावी .

**विषय क्र. १५४**
**मा .सौ. ज्योत्स्ना एकबोटे व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. ५.१२.२०१७ चे पत्र .**

प्र.क्र. १४ मध्ये सि.टी. स.नं. ९५१ फायनल प्लॉट नं. ३३४, वडारवाडी, भांबुर्डा, शिवाजीनगर. पुणे. येथे झोपडपट्टी पुर्नवसनाचा प्रकल्प विकसित करण्यास सुरु करण्यात आला आहे. सदर मिळकतीमध्ये पुर्वी तेथील झोपडपट्टीतील नागरिकांना वापराकरिता सार्वजनिक शौचालय अस्तित्वात होते. परंतु सदर सार्वजनिक शौचालय हे पुर्नवसनामध्ये अडथळा ठरत आहे.

तरी सदरील वापराविना बंद अवस्थेत असलेले सार्वजनिक शौचालय पाडून टाकण्यात यावी.

**विषय क्र. १५५**
**मा .योगेश मुळीक व मा.सौ. श्वेता खोसे–गलांडे यांचे दि. ७.१२.२०१७ चे पत्र .**

पुणे मनपा मार्फत कमला नेहरु हॉस्पिटल येथे लायन्स क्लब ऑफ पुना चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे. या संस्थेमार्फत पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमानाने डायलेसिस सेंटर सुरु करण्यात आले आहे. यामुळे सदर भागातील बहुसंख्य नागरिकांना अत्यंत अल्प दरात याचा लाभ घेता येत आहे. याच अनुषंगाने पुणे मनपाचे येरवडा भागातील राजीव गांधी हॉस्पिटलमध्ये कोठारी डायलेसिस सेंटर या संस्थेने पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमानाने अल्प दरात डायलेसिस सेंटर व पॅथोलॉजी लॅब सुरु करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी पुणे मनपा राजीव गांधी हॉस्पिटलमध्ये कोठारी डायलसिस सेंटर व पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमानाने अल्प दरात डायलसिस सेंटर व पॅथोलॉजी लॅब सुरु करण्यात यावे.

**विषय क्र. १५६**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१६–१७ मधील र.रु.५० लाख पर्यंतची कामे करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ /समाज कल्याण/ ६०२, दिनांक .७.१२.२०१७ चे पत्र.

**विषय क्र. १५७**

पुणे महानगरपालिके मार्फत पुणे शहरातून त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय/अभियांत्रिकी /संगणकीय/व्यवस्थापन/विधी/वाणिज्य इ.) घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय एकूण ५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु.२ लाख एकदाच अर्थसहाय्य देणेबाबत मा.पक्षनेते सभा विषय क्र. ३६, दिनांक ६/६/२०१६ तसेच नसजा क्र.१४५५, दि.८/६/२०१६ रोजीच्या पत्राला अनुसरुन मा.महा. आयुक्त यांनी जा. क्र. मआ/ सविवि/५३२,दि. १६.११.२०१७ अन्वये पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२२.११.२०१७ च्या सभेत ठरले होते. )**

उपनगरसचिव
पुणे महानगरपालिका